महाराष्ट्र शासन

# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१
दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८
संकेतस्थळ: http://www.dmer.org

क्र.संवैशिवसं/प्रशासकीय बदली/३,४-ड/ ८८५२ /२०१९ दि. २० /०५/२०१९

**परिपत्रक**

प्रति,
अधिष्ठाता/अधिक्षक/अधिक्षिका/प्राचार्य/प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक

---

विषय : बदली अधिनियम-२००५ नूसार लिपिक वर्गीय (अतांत्रिक संवर्गातील) सन २०१९ या सालातील बदलीपात्र कर्मचा-यांची यादी प्रसिद्ध करण्याबाबत...

संदर्भ : १) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दि.२५ मे २००६
२) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/ कार्यासन १२ दि.०९.०४.२०१८

शासन अधिसूचना दि.२५ मे २००६ अन्वये महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ अस्तित्वात आहे. सदर अधिनियमाच्या अनुषंगाने शासनाने दि.०९.०४.२०१८ च्या शासन निर्णयान्वये शासकीय कर्मचा-यांच्या प्रशासकीय बदली करण्यासाठी समुपदेशनाद्वारे बदली धोरण निश्चित केलेले आहे. त्यानूसार संचालनालयाच्या अधिनस्त संस्थेतील सन २०१९ या सालातील लिपिक संवर्गातील (अतांत्रिक संवर्ग) बदलीपात्र कर्मचा-यांची यादी व रिक्त पदांचा तपशिल संचालनालयाच्या www.med-edu.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच संस्थांच्या ई-मेल वर पाठविण्यात येत आहे.

तरी संबंधित संस्थांप्रमुखांनी आपल्या संस्थेतील कर्मचा-यांच्या सदर बाब निदर्शनास आणून दयावी व बदलीपात्र कर्मचा-यांचे विकल्प दि.२३.०५.२०१९ पर्यंत "ड" कार्यासनास सादर करावेत.

सह संचालक (दंत)
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.